नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/09/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## रोडरोलर ची बॅटरी चोरी करणारा आरोपी अटकेत

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत खापरी रेल्वे गेट कळमेश्वर येथे दिनांक ११/०९/२०२३ चे १३.०० वा. ते १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– लक्ष्मीप्रसाद श्रीनेतराम झारीया, वय ३५ वर्ष, रा. मंगीला पो.स्ट सुकरी थाना बरगी जि जबलपुर (म.प्र) हा अग्रवाल इंटरप्रायजेस कंपनी बैतुल सुपरवाईजरचे काम करत असुन कंपनीचे काम नरखेड ते नागपुर रेल्वे लाईनचे काम सुरू असुन खापरी रेल्वे गेट कंपनीचे जेसीबी. हायडा, डम्पर, व रोड रोलर असे उभे असता रामु नावाचा रोडरालरचा चालक याने रोडरोलर चालु करण्या करीता गेला असता चालु झाले नाही रोडरोलर चालु न झाल्याने आजुबाजुला पाहीले असता एक इसम आपले डोक्यावर बॅटरी किंमती अंदाजे ८,०००/– रू. ची घेवुन जातांनी दिसला त्याला फिर्यादीने व इतर लोकांनी मिळुन त्याला नाव विचारले असता **आशिश विष्णुंजी कोल्हे, वय २७ वर्ष, रा. खापरी शिवार ता. कळमेश्वर जि. नागपुर** असे सांगीतले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अतुल शेन्डे ब. नं. १८१३ मो. नं. ८२०८१०१७८५ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कळमेश्वर :– दिनांक १०/९/२०२३ चे ११/०० वा. ते १६/०० वा. दरम्यान फिर्यादीला दोन मुले असुन मोठा मुलगा वय १८ वर्ष व मुलगी वय १४ वर्ष ०५ महीने असून मुलगी इयत्ता ९ वी शिक्षण घेत आहे. याआधी मुलगी कोणालाही काही न सांगता ०३ वेळी घरून निघुन गेली होती व परत सुध्दा आली होती. यातील फिर्यादी ही सकाळी ६/३० वा. कंपनीत कामाला गेली असता घरी मुलगा मुलगी व सासु व पती असे घरी होते. फिर्यादी सायंकाळी ०४.०० वा. कामावरून घरी आली तर तिला मुलगा दिसला तेव्हा फिर्यादीने विचारले की मुलगी कुठे आहे मुलाने सांगीतले की मुलगी ही ११/०० वा. पासुन कोणालाही काही न सांगता निघुन गेली ती घरी परत आली नाही तेव्हा तीचा शोध नातेवाईक व तीचे मैत्रीण हीच्याकडे शोध घेतला असता मिळुन आली नाही. कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या मुलीला फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ. मन्नान ब. नं. १०४ मो. नं. ९४२३६०४८२८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर